International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वे :दिशा आणि दृष्टी

डॉ .युवराज मानकर

प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग, शिवशक्ती कला ,वाणिज्य महाविद्यालय,बाभुळगाव,
जि .यवतमाळ-४४५००१

सारांश:

लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वे: दिशा आणि दृष्टी या प्रस्तुत विषयाच्या अनुरोधाने एकसंध राष्ट्रासमोर असलेली सर्वच क्षेत्रातील वर्तमानकालीन अंतर्विरोधग्रस्ततेची आव्हाने कशी राष्ट्रविरोधी आहे. यासंबंधीचा विचार यात करतांना राष्ट्र म्हणजे काय? देशहीत बांधणीचे घटक कोणते आहेत? साहित्य समाजाच्या गरजेतून निर्माण होणारे आणि समाजाला दिशा देणारे असते हा केवळ समजच आहे की गैरसमज आहे. लोकसाहित्य म्हणजे काय? लोकसाहित्याने स्वतःभोवती निर्माण केलेल्या अंधश्रद्धात्मक चौकटीचा पुनर्रविचार करून परतंत्र मनाच्या चौकटीचा मौखिक आविष्कार करणारे वैदिक लोकांचे लोकसाहित्य आणि स्वतंत्र मनाच्या मुक्तीचा शब्दकृतीरूप आविष्कार करणारे श्रम करणाऱ्या लोकांचे लोकसाहित्य, त्यांच्या परंपरेचा संक्षिप्त आढावा, या लोकसाहित्याच्या लोकमनावर पडलेला अनिष्ट प्रभाव त्यातून एकसंध लोकांची अनेकार्थाने झालेली विभागणी, त्यामुळे खरे लोकसाहित्य कोणते ? आजचे आंबेडकरवादी, आदिवासी, सत्यशोधक आणि ग्रामीण लोकसाहित्याच्या अंतःकरणाचा धावता ऊहापोह यात केला आहे.ज्या लोकसाहित्यातून फाटलेली मने लोकतत्त्वांच्या सुई- धाग्यांनी एकसंध केली जातात, ती लोकतत्त्वे म्हणजे काय ? कोणत्या लोकतत्त्वांचेद्वारे राष्ट्रबांधणी करता येऊ शकेल आणि अशी लोकतत्त्वे परतंत्र मनाने निर्माण केलेल्या लोकसाहित्यात आहेत का,की मनाने स्वतंत्र झालेल्या लोकसाहित्यात आहे. देशहीत बांधणीत लोकसाहित्याची नेमकी भूमिका कशी यासंबंधीबुद्धिप्रामाण्यवादी,मानवतावादी,विज्ञानवादी, इहवादी आणि पुनर्रचनावादी दृष्टीने यात विचार केला गेला आहे. त्यासाठी प्रस्तावना, बीजशब्द ,शोधविषयाची समस्या, शोध विषयाचा उद्देश, शोध विषयाचा पुर्वगत आढावा, शोध विषयाची संशोधनपद्धती, शोध विषयाची व्याप्ती आणि मर्यादा, शोध विषयाचे विश्लेषण, निष्कर्ष आणि संदर्भग्रंथ इ. च्या अनुरोधाने आकलन केले आहे आणि लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वांची दिशा आणि दृष्टी मांडली आहे.

प्रस्तावना:

मराठी साहित्याच्या दुनियेत लिखित आणि अलिखित स्वरूपाचे साहित्य पाहावयाला मिळते.त्यासंबंधीची चर्चा प्रदीर्घ काळापासून साहित्यविश्वात होत आली आहे.लिखित स्वरूपाचे साहित्य हे व्यक्तिनिर्मित,विशिष्ट रचनातंत्राचा उपयोग केलेले साहित्य असते तर अलिखित स्वरूपाचे साहित्य हे वाणीद्वारे प्रकट केलेले साहित्य असते.लिखित स्वरूपाच्या साहित्याला मराठी साहित्य या संज्ञेने संबोधले जाते तर अलिखित स्वरूपाच्या साहित्याला लोकसाहित्य किंवा लोकवाङ्मय या संज्ञेने संबोधले जाते.मुळात साहित्य वर्तुळात साहित्याची अशी विभागणी करणे हेच चुकीचे आहे.कारण साहित्याचा हेतू हा जोडण्याचा आहे. फाटलेल्या जीवनाला शिवण्याचा आहे.तसेच मराठी साहित्य आणि लोकसाहित्य किंवा लोकवाङ्मय यांचे निर्माते हे लोक समूहातील कोणी तरी व्यक्ती,लोकजीवनद्रव्यांच्या सामुग्रीचा वापर करून लोकांसाठीच साहित्य आविष्कृत करत असते.अर्थात या दोन्ही साहित्यात लोकांच्याच भावना,विचार,त्यांचे

मानसविश्व,त्यांची जीवनधारणा,जीवनपद्धती व्यक्त झालेली असते.असे असताना देखिल मराठी साहित्य आणि लोकसाहित्य यांच्यात भेद केला जाणे खरे तर लोकांचाच बुद्धिभेद करण्यासारखे आहे.विशेषतःआज आधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही असे साहित्य विषयक भेद जोपासतो आहोत ही बाब वर्तमानाला न पटणारी आहे. आजही आपणाला पारंपरिक लोकमन व्यक्त करणाऱ्या लोक साहित्याची परिवर्तन सन्मुख काळातही विचार करण्याची आवश्यकता निर्माण होणे ही लोक साहित्याच्या संदर्भाने नव्याने पुनर्विचार आणि या लोकसाहित्याची पुनर्रचना करायला सांगणारी ही बाब आहे .लोकसाहित्याची नेमकी प्रकृती कशी आहे,याचे उत्खनन करायला बाध्य करणारी आहे. उपरोक्त दोन्हीही साहित्यातून कोणते ना कोणते तरी तत्त्व,मूल्ये अभिव्यक्त झालेली असतात.ही तत्त्वे लोकसमूहाची, लोकमानसाचीच असतात.ती लोकसमूहाच्या,राष्ट्राच्या बांधणीचे,उभारणीचेच कार्य करीत असतात.जेव्हा जेव्हा राष्ट्रजीवन,समाजजीवन धोक्यात येते आणि त्यांच्या नव्या बांधणीच्या सर्व शक्यता संपूर्णतः मावळतात तेव्हा तेव्हा माणूस,लोक,समूह साहित्याकडे मोठ्या आशेने आणि अपेक्षेने पाहातात.तेव्हा लोकांच्या मनातील देशबांधणीचे घटक कोणते आहेत.कोणत्या लोक तत्त्वांवर देशाची बांधणी केली जाऊ शकते आणि कोणत्या वैभवशाली लोकसाहित्यातून देशबांधणीसाठी लागणारे कोणती लोकतत्त्वे सापडू शकतील यासंबंधी येथे विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

बीजशब्द: देश, देशबांधणीचे घटक, लोकसाहित्य, लोकतत्त्वे

शोधनिबंधाची समस्या:

भारतीय संविधानाने विविधतेने फाटलेल्या या देशाला आजवर भारतीय म्हणून एकत्रित बांधून ठेवले आहे. हे भारतीय संविधानाचे अर्थात भारतीय लोकांचे स्वप्न या काळात भंगणार की काय ? झालेली देशबांधणी पुन्हा कोसळणार की काय ? हे बांधलेले राष्ट्र जर का कोसळले तर त्याची बांधणी कशाने करावयाची ? पक्क्या देशबांधणीची तत्त्वे कोणती ? या तत्त्वांचा शोध कुठे घ्यायचा ? तो लोकांच्या मनांत घ्यायचा की लोकांचे मन,मानस आणि त्यांच्या जीवनाचा सार गर्भ, जीवनतत्त्वे,जीवनसत्य ज्या लोकसाहित्यातून व्यक्त झाली आहे त्या साहित्यातून घ्यायचा ? लोकसाहित्य म्हणजे काय? लोकतत्त्वे म्हणजे काय? या लोकतत्त्वांची देशबांधणीत किंवा उभारणीत कोणती भूमिका आहे ? या साहित्यातील लोकतत्त्वाच्या आधारे देशाची बांधणी करता येईल काय असे काही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात.

शोधविषयाचा उद्देश:

देशबांधणीत लोकसाहित्यातील लोकतत्त्वांच्या दिशा आणि दृष्टीचा विचार करण्याचा उद्देश हा आहे की, देश बांधणीच्या संभाव्य घटकाची चर्चा करणे,लोकसाहित्याची प्रकृती आणि संकल्पना समजून घेणे, लोकतत्त्व या संज्ञा संकल्पनेचा विचार करणे , लोकसाहित्याच्या पुनर्रचनेचा विचार आंबेडकरवादी साहित्य आणि आंबेडकरवादी दृष्टीने लावणे आणि लोकतत्त्वांचा अन्वयार्थ लावून त्याची देशबांधणीतील दिशा आणि दृष्टी विशद करणे या प्रमुख उद्देशाने सदर विषयावर लेखन करण्याचा प्रयत्न यात केला आहे.

शोधविषयाचा पूर्वगत आढावा:

आजवर मराठी साहित्यात लोकसाहित्याच्या अनुषंगाने बराच अभ्यास झाला आहे. हा अभ्यास पाश्चात्य देशाच्या प्रभावातून सुरू झाला आहे. याचा अर्थ या देशात लोकसाहित्य जन्माला येण्यासाठी सुपिक मनाची भूमी नव्हती असे नाही.परंतु या साहित्याचा अभ्यास कसा करावयाचा याची दिशा आणि तंत्र माहीत नव्हते. इंग्रजाच्या आगमनानंतर खऱ्या अर्थाने लोकसाहित्य अभ्यासाला दिशा आणि चालना मिळाली आहे. यातूनच पुढे वि.का.राजवाडे, दत्तो वामन पोतदार, डॉ.रा.चि.ढेरे, म.मो.वाळींबे, प्रभाकर मांडे, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, डॉ.ना.गो.कालेलकर, तारा भवाळकर,मधुकर

वाकोडे,डॉ. यशवंत मनोहर ,डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ.म.सु.पगारे,डॉ.विद्या व्यवहारे,डॉ.शरद व्यवहारे, हिंदीत डॉ.रविंद्र भ्रमर,डॉ.सत्यैंद्र,डॉ.शाम परमार इत्यादींनी लोकसाहित्य,लोकतत्त्वे इत्यादी संबंधी संशोधनात्मक अभ्यास केला आहे आणि काही अभ्यासक अभ्यास करीत आहेत तसेच अनेक विद्यापीठातून लोकसाहित्यावर संशोधन होत आहे आणि संशोधन करण्याचे आव्हान केले जात आहे. असे सर्व असताना मात्र 'लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वांची :दिशा आणि दृष्टी' या विषयाच्या आणि विषयाच्या उद्देशाच्या अनुरोधाने तसेच आंबेडकरवादी साहित्य व आंबेडकरवादी दृष्टीने अभ्यास फारसा झालेला आढळत नाही.जो अभ्यास झाला तो पारंपरिक अर्थाने लोकगीते,लोककथा,लोकरूढी,लोकपरंपरा,लोकमानस,लोकश्रद्धा,लोकउत्सव,लोकधर्म,त्याचे स्वरूप, व्याप्ती,संकल्पना स्पष्ट करणारा तर लोकसाहित्याचा ग्रामीण, संत साहित्याशी अनुबंध जोडण्याच्या दिशेने अभ्यास झाला आहे. त्यामुळे सदर विषयाच्या आणि उद्देशाच्या तसेच आंबेडकरवादी साहित्य आणि आंबेडकरवादी दृष्टीच्या अनुषंगाने हा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

शोधविषयाची संशोधन पद्धती:

'लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वे : दिशा आणि दृष्टी" या विषयाचा विचार करताना तो वस्तुनिष्ठ आणि विश्लेषणात्मक पद्धतीने केला आहे.याविषयाच्या अनुरोधाने ज्येष्ठांशी चर्चा करून चर्चात्मक पद्धतीचा यात आवलंब केला आहे .यासंबंधीचा विचार बुद्धिप्रामाण्य,विवेकवाद,तर्कनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टीने करण्याचा प्रयत्न केला आहे.या विषयाच्या समस्येचा विचार करण्यासाठी, याविषयाच्या चिंतनाची चाल ही या विषयाच्या उद्देशाने करण्यासाठी देश अथवा राष्ट्र म्हणजे काय, देशहीत बांधणीचे घटक कोणते,लोकसाहित्य म्हणजे काय,
लोकतत्त्वे म्हणजे काय,लोकसाहित्य आणि लोकतत्त्वे यांचे नातेसंबंध, आणि लोकतत्त्वांची देशहीत बांधणीतील दिशा आणि दृष्टी विशद करण्यासाठी उपलब्ध लोकसाहित्य संदर्भसाधनाचा तसेच आंबेडकरवादी ग्रंथाचा आधार घेतला आहे आणि या विषयाचा आंबेडकरवादी साहित्य, विचार या दृष्टीने, या पद्धतीने या विषयाचा विचार केला आहे.तसेच ही या अभ्यासाची व्याप्तीही आहे आणि ही मर्यादा देखील आहे.

'लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वे :दिशा आणि दृष्टी ':-

आज भारत हा देश म्हणून राहिलेला दिसत नाही. त्याचे कारण सर्वत्र सर्वांच्या अस्मिता उफाळून आलेल्या दिसत आहे. भारत हे हिंदूराष्ट्र आहे अशा घोषणा सत्ताधीशांसह गलोगल्लीत ऐकायला मिळत आहे. भारत या देशात धर्माच्या,पंथाच्या,जातीच्या,वर्णाच्या,भाषेच्या,भूप्रदेशाच्या अस्मितेचे ढग अधिक गडद झालेले आहेत.जो तो या अस्मिता डोक्यावर आणि डोक्यात घेऊन मिरवू लागला आहे.केवळ पंधरा ऑगस्ट आणि सवीस जानेवारी याच दिवशी आपण राष्ट्र म्हणून स्वतःला संबोधतो ऐरव्ही आपण परस्परांपासून फाटलेपणानेच जगत असतो. अशा अंतर्विरोधग्रस्त वर्तमानातील वर्तनाला राष्ट्र म्हणता येईल का ? आतून अशा विविधतेने फाटलेले असतांना या राष्ट्राला राष्ट्र कसे म्हणता येईल ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा राष्ट्र म्हणजे काय ? हे समजून घेणे आवश्यक आहे. स्टॅलिन राष्ट्राची व्याख्या करतात,' समान भूमी, समान आर्थिक जीवनपद्धती व एकीची मानसिकता असा ऐतिहासिकदृष्ट्या उत्क्रांत झालेला व स्थिर सांस्कृतिक समाज म्हणजे राष्ट्र.'१ तर कॉ. शरद पाटील म्हणतात,' भौगोलिकता, भाषिकता, सांस्कृतिकता, राजकीयता व आर्थिकता यांची एकमयता निर्माण झाल्यानंतर आधुनिक राष्ट्र तयार होते.'२ अशी व्याख्या करतात तर विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,' जे लोक मतभेद असूनही स्वतः साठी आणि विरोधकासाठी सामान्य उद्देशाचा स्वीकार करतात त्यांना समुदाय म्हणतात. परंतु जे लोक एकमेकांपासून भिन्न असतात आणि आपापल्या अंतिम उद्दिष्टांची पूर्ती करण्याची मनिषा बाळगतात त्यांना राष्ट्र म्हणतात.'३ तर आंबेडकरवादाची मांडणी करणारे जेष्ठ

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

विचारवंत डॉ.यशवंत मनोहर म्हणतात,' राष्ट्र म्हणजे समध्येयी लोकांचा समूह.राष्ट्र परस्परांना उन्नत करण्यासाठी झटणाऱ्या लोकांचा समूह ! एक हृदय, एकचित्त, समान निष्ठा- समान दिशा हे सर्व लोकांचे मानसशास्त्र होते, तेव्हा त्या लोकसमुहाला राष्ट्र ही पदवी प्राप्त होते.'४ या सर्व व्याख्यांचा विचार केला तर यात लोक आणि भूमी या दोन संज्ञेला विशेष केंद्रस्थानी ठेवून कोणी भौतिकतेला तर कोणी एकसंध मानसिकतेला प्राधान्य देवून व्याख्या केलेल्या आहेत. सामान्य ध्येयासाठी जगणारा म्हणजे समाजसमूह आणि अंतिम ध्येयप्राप्तीसांठी परस्पर समाजसमूहातील मैतक्य विरघळून एका समान मानसिकतेने,एकसंधतेने,एकचित्ताने, एका हृदयाने,एकाच निष्ठेने आणि एकाच दिशेने अंतिम ध्येय साध्यत्वासाठी उत्क्रांत होत जगणारे लोक म्हणजे राष्ट्र होय.यात लोकांनी आपण कशासाठी जगतो, आपल्या जगण्याची दिशा काय,आपल्या जगण्याचे अंतिम प्रयोजन काय, आणि त्यासाठी कशाचे विसर्जन करावे लागेल आणि कशाचे सर्जन करावे लागेल यासंबंधीचा स्वयंनिर्णय हाच राष्ट्र या संकल्पनेला बळ देणारा आहे .परंतु आजवर लोकांनी आपल्या जगण्याचे अंतिम प्रयोजन आणि दिशाच निश्चित केलेली नसल्यामुळे आपण अजूनही एक राष्ट्र होऊ शकलो नाही.एकाच राष्ट्रात आपण अनेक स्तरांचे, जाणिवेचे, विचारांचे, आचारांचे आणि अस्मिताचे राष्ट्र उभारले आहेत आणि उभारतो आहोत. तेव्हा अशा विविधतेने नटलेल्या पण विविध मानसिकतेने फाटलेल्या लोकांचे कसे राष्ट्र उभारता येईल.खऱ्या राष्ट्रांची बांधणी कशी आणि कशावर करता येईल हा खरा प्रश्न आहे .

देशहीतांचे घटकः-

देशाची बांधणी करणे म्हणजे एखाद्या सुंदर अशा वास्तूचीच बांधणी करणे असते .वास्तूच्या बांधणीसाठी रचनाकाराची आवश्यकता असते .रचनाकारांना विचारपूर्वक वास्तूंच्या नकाशासह त्याला लागणाऱ्या कच्चा मालाचा आराखडा काढावा लागतो. नुसता नकाशा काढल्याने कल्पनेतील सुंदर वास्तू उभी होत नाही.यासाठी पाया खोदावा लागतो, त्यात पिल्लर उभे करावे लागतात, व्यवस्थित विटांची रचना करावी लागते, त्यावर छत टाकावे लागते, त्याला ये- जा करण्यासाठी दारे, खिडक्या बसवावी लागतात, वास्तू उभी करण्यासाठी रेती,सिमेंट,गज, विट्टा आणि लेबर यांचीही गरज असते, वास्तू बांधणीत रेतीला चाळून घ्यावे लागते, हे चाळणे म्हणजे छाननी करून घेणे असते, तसेच राष्ट्र बांधणीत लोकांच्या मनाची छाननी करावी लागते. वास्तूच्या बांधणीसाठी सारख्या, समान स्वरूपाच्या विटांचा यथायोग्य वापर करावा लागतो, ह्या विटा समानतेच्या तत्त्वांचे द्योतक असून देश बांधणीत या समानतेच्या तत्त्वाला विशेष महत्त्व आहे. तर वास्तूच्या उभारणीत विटांच्या जोडणीसाठी सिमेंटचीही गरज असते. सिमेंट हे जोडण्याचे कार्य करते, त्यामुळे सिमेंट हे एका अर्थाने बंधुतेचे तत्त्व होय, हे बंधुतेचे तत्त्व देश बांधणीत अतिशय आवश्यक आहे याशिवाय देश बांधणी शक्य होत नाही .या वास्तू निर्माणासाठी लेबरची आवश्यकता असते आणि या लेबरनी समान निष्ठेने, समान ध्येय दिशेने, एकसंध, एक हृदय होऊन वास्तू बांधणीचे कार्य केल्या शिवाय वास्तू पुर्नत्वाला येऊ शकत नाही. हे लेबर म्हणजे जनता किंवा लोक होय. देशहीत बांधणीत या लोकांना विशेष महत्त्व असते. हे लोक समध्येयी, सम दिशेने, समनिष्ठेने एकसंध झाल्याशिवाय देशाची देखील बांधणी होत नाही . यासाठी लोकांच्या मनाची छाननी का करायची तर त्यांच्या मनातील विषमतेची , अनिष्टतेची घाण काढून त्यांच्या मनाला एकसंध, समध्येयी आणि समान निष्ठेने कार्य करण्यासाठी त्यांचे मन निर्मळ करणे आवश्यक असते, मनाची निर्मलता कशासाठी तर एकसंध होण्यासाठी, समानता कशासाठी तर समान विचार ध्येय दिशेने एकत्र येऊन जीवन प्रवास करण्यासाठी, मजूर म्हणजे अखिल मानवी समाज, हा मानवी समाज एकत्र कधी येईल जेव्हा त्यांची मने निर्मळ असतील तेव्हा ! याचा अर्थच असा की, मानवी समाज एकत्र असल्याशिवाय, त्यांची मने निर्मळ झाल्याशिवाय, त्यांच्यात समानता असल्याशिवाय आणि ते एकसंध असल्याशिवाय राष्ट्र बांधणी होऊ शकत नाही.' एकसंधपणा, समानता, मनाची निर्मळता आणि जनता' जिथे असेल तेथे संविधान असते

आणि जेथे संविधान असते तेथे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही तत्त्वे असतात तेथेच याद्वारे राष्ट्र बांधणी होत असते. राष्ट्र बांधणीतील प्रमुख घटक हे 'लोक' आहेत. त्याच्या अनुरोधाने इतर घटक येतात. ही देशहीत बांधणीची घटक तत्त्वे आहेत आणि ती राष्ट्रीय जीवनात अत्यंत महत्वाची आहेत. परंतु आज संविधानाला अभिप्रेत 'लोक' हे लोक आहेत का ? की लोकांत आणि त्यांच्या जीवनात अंतर्विरोध आहे. तसेच संविधान प्रत्यक्षात अनुसरले जाते का ? संविधानाच्या स्वप्नाच्या ध्येय दिशेने लोक मार्गक्रमण करते आहेत काय ? यासारखे गंभीर प्रश्न उद्भवतात. हे प्रश्नच अस्मिता आणि अस्तित्व जागृत करणाऱ्या ,लोकांना भानावर आणणाऱ्या साहित्याच्या अंतरंगाकडे एका आशेच्या, पुनर्रचनेच्या दृष्टीने बघायला लावतात.

लोकसाहित्य म्हणजे काय**?:-**

'लोकसाहित्य' या सामासिक शब्दात 'लोक' आणि 'साहित्य' या दोन पदावर लोकसाहित्य ही संज्ञा उभारलेली आहे. येथे 'लोक' ही संज्ञा समजून घेणे अगत्याचे आहे.मधुकर वाकोडे आपल्या संशोधनात म्हणतात,' लोक म्हणजे परंपरागत जीवन प्रवाहात एकजिनसीपणाने स्थलसापेक्षतेने ,विविधतेने आपले अस्तित्व प्रकट करीत परिवर्तनशीलतेने जगणारा मानवी समूह होय' ५,तर डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, 'आम्ही भारताचे लोक म्हणजे भारतीय संविधानाच्या इच्छांना निष्ठापूर्वक अनुसरणारे लोक असेच म्हटले पाहिजे. धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अशा कोणत्याही कारणावरून भारतातील लोकांमध्ये भेदभाव करणारे लोक भारतीय संविधानाला अभिप्रेत असे भारताचे लोक नाहीत. आदि अंती मी केवळ भारतीय आहे, असेच भारताच्या माणसाने म्हटले पाहिजे.'६ या उपरोक्त दोन विचारांवरून लोक हा शब्द भूतकालीन परंपरा आणि भविष्यकालीन परिवर्तनाकडे तोंड करून जगणारा आहे तर लोक हा शब्द कोणत्याही प्रकारचा भेदभाव अमान्य करणारा असा आहे. याचा अर्थ लोक या शब्दांची मुळ प्रकृती ही निरागस बालकासारखी, प्रांजळ , निकोप,निर्मळ,भेदातीत, नैसर्गिक, मुक्त स्वतंत्र मनाची , मन आणि मेंदू समतेच्या नैसर्गिक तत्त्वांधिष्ठीत असलेल्याचा निर्देश करणारी आहे.लोक हा शब्द आणि त्याच्यातील मूळ अर्थाला लोकसमूहांनी विविध रंगाचे, जातीचे, धर्माचे, वर्णाचे, पंथाचे, आचार विचारांचे कपडे घातले. त्यामुळे निसर्गत: असलेला लोक हा शब्द आणि त्यावर लादलेल्या अर्थाने लोक या शब्दांच्या मूळ प्रकृतीची हत्याच करून टाकली, त्याला त्याच्या नैसर्गिक तत्व दिशेने त्याचा विकास खुंटवून टाकला. त्यामुळे लोक हा शब्द मुळचा झरा राहिलाच नाही. उलट बाह्यगत लादलेल्या सत्ता शक्ती मुळे त्याचा मुळचा झरा आटला, तो गोठवला गेला, तो अवरुद्ध केला. त्यामुळे लोक' हा शब्द द्विअर्थी झाला आहे. तो आपले आणि एकसंध असा एक अर्थ सांगतो तर परके, दुसरे,वर्तूळ कंसाबाहेरचे असा दुसरा मर्यादित अर्थ सांगतो. भारतीय संविधानाने लोक या शब्दाचा मुळचा आटलेला झरा आणि चेहरा पुन्हा सुरू केला आणि आरसा दाखवला आहे.

'साहित्य' हा शब्द वरील दोन्ही अर्थाला वागविणारी आणि त्या अर्थाचे वहन करणारी व्यापक अशी संज्ञा आहे. याचा अर्थ साहित्य एकाच जाती, धर्म, वर्ण, वर्ग, वंश आणि भाषा असणाऱ्या आणि परस्परात आपलेपणा वाटणाऱ्या लोकांचे हित आणि आपल्या जाती, धर्म, वर्ण, वर्ग, वंश आणि भाषा नसणाऱ्या अशा अर्थाने परक्या, दुसऱ्या लोकांचे हित ज्या साहित्यात जोपासले जाते त्याला लोकसाहित्य असे मानता येईल.अर्थात लोकसाहित्य ही संज्ञाच लोकांना जाती, धर्म, वर्ण, वर्ग, वंश आणि भाषा या घटकांवरून विभक्त करणारी आणि लोकांना जोडणारी देखील आहे. ती अखिल मानवाच्या एकसंधतेचा,एकहितैषांचा विचार करणारी संज्ञा नाही. ती परस्पर विरुद्ध लोकांच्या हिताचा विचार करणारी संज्ञा आहे. लोकसाहित्यासंबंधी डॉ.विद्या व्यवहारे म्हणतात,' लोकसाहित्य म्हणजे पारंपरिक जीवनपद्धती, लोकमानसाच्या कृती आणि उक्ती म्हणजेच लोकसाहित्य''७ तर डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात, 'लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे तर लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे साधन होऊ शकते.'८ तर डॉ.तारा भवाळकर

म्हणतात,"लोकसाहित्य हे लोकजीवन रितीचा, एक अविभाज्य भाग असतो, त्यामुळे लोकसाहित्यातील कोणत्याही घटकांची निर्मिती केवळ रंजनाच्या हेतूने असू शकते. लोकसाहित्य हे लोकमानसाचे लोकभावनाचे लोक श्रद्धांचे व्यक्त रूप असते.'९ या व्याख्यांवरून लोकसाहित्य ही लोकांची पारंपरिक जीवनपद्धती, लोकांचे मानस,लोकांच्या कृती,उक्ती, श्रद्धा, समजूती, लोकांचे विधी, त्यानुसार आचरण, त्यांचे नवस,उपास,सण,उत्सव, संस्कार,देवी देवतां शकून अपशकून यावरील लोकश्रद्धा,त्यांचे रितीरिवाज, रूढी, परंपरा, त्यांच्या प्रयोगशील कला,भौतिक संस्कृती या सर्वांचा या साहित्यात समावेश केलेला दिसतो.लोकसाहित्य हे लोकांच्या आदिमतेशी,त्यांच्या पारंपरिक वर्तूळ कक्षेसह त्याच्या प्रवाहीत जीवनधारेचे व्यक्त रूप असलेले दिसते.यातून लोक साहित्याच्या प्रकृती धर्माच्या रूपरेषाचा एक अंदाज येतो. हे लोकसाहित्य पारंपरिक लोकश्रद्धा, लोकरूढी,लोकमानस व्यक्त करण्याचा अट्टाहास करत असेल आणि त्यालाच लोकसाहित्य समजण्याचा आग्रह करत असेल,आपल्या गतकालीन वैभवाला दिव्य स्वप्न मानून गोडवे गात असेल,परिवर्तनाला आपल्या कुशीत न घेता त्याला थोपवत असेल,विज्ञानाचा जीवनव्यवहारात उपयोग करून आपल्या अंतस्थातून वैज्ञानिकदृष्टीला जागा देत नसेल,केवळ वाणीयुक्त, अलिखित, मौखिक, कर्ताविरहीत आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केलेल्या जीवन व्यवहाराची,लोकमानसाची बाजू घेत असेल तर असे लोकसाहित्य प्रवाहित लोकजीवन व्यवहाराला ,त्याच्या गतिशील मानस विचाराला,त्याच्या बदललेल्या आणि बदलू पाहणाऱ्या ध्येय दिशेला, त्याच्या विधायक लोकहितैषी परंपरेला ,बदललेल्या काळात निर्माण झालेल्या मूल्य व्यवस्थेला,तत्त्वांना गोठवण्याचा ,थांबवण्याचा या काळातील लोकजीवनाचा महान गुन्हा करत आहे असे म्हणावे लागते. इतकेच नव्हेतर हे पारंपरिक लोकसाहित्य लोकांनाच लोकांपासून विभक्त करत आहे, शोषणाचे, कर्मकाडांचे, जातीचे, धर्माचे, वर्णव्यवस्थेचे किल्ले मजबूत करत आहे आणि विषमतेला कायम ठेवून लोकांना लोकांपासून तोडण्याचेच, त्यांच्यात भेदभावच कायमचा चिरंजीव करत आहे असे प्रतिपादन करता येईल. तेव्हा बदलत्या काळात हे लोकसाहित्य स्वतःची तपासणी, पुनर्रचना करण्याचे एका अर्थाने सांगत आहे.यावरून 'लोकसाहित्य म्हणजे बौद्धिक,वैज्ञानिक, मानवतावादी, इहवादी जीवनदृष्टीचा भेदातीत, जात्यातीत, धर्मातीत जीवनाशय आणि त्या जीवनाशयाच्या भेदविरहीत लोकसमूहमनाच्या स्वतंत्र झालेल्या जाणिवेचे प्रतिनिधी म्हणून अभिव्यक्त झालेल्या शब्दकृती रूपाला लोकसाहित्य असे म्हणतात.' लोकसाहित्याच्या संदर्भाने डॉ. यशवंत मनोहर म्हणतात,' आर्यांनी येथील आर्येत्तरांना आपल्याहून निराळे परके म्हणून लोक म्हटले. वैदिक आणि जन, वैदिक आणि लोक अशा दोन जीवनधारा वेदकाळात आणि वेदोत्तर काळात आपणास दिसतात.'१० यावरून भारतात लोकांचे पारंपरिक लोकसाहित्य आणि परिवर्तनवादी लोकसाहित्य असे दोन प्रकारचे लोकसाहित्य अस्तित्वात होते.यातील आर्यांचे म्हणजे वैदिकांचे लोकसाहित्य आणि दुसरे सर्व सामान्य लोकांचे म्हणजे अनार्यांचे (बहुजनांचे) मूळ रहिवाशांचे लोकसाहित्य असे सांगता येईल.बाहेरून आलेल्या आर्य लोकांनी वंशश्रेष्ठत्व कायम ठेवण्यासाठी सिंधूनदीच्या खोऱ्यात वस्ती करून राहत असलेल्या एतद्देशीय अनार्य लोकांवर आक्रमण केले. त्यांच्यावर वर्चस्व निर्माण केले.या वंश श्रेष्ठत्त्वाच्या वर्चस्वातून आर्यांनी अनार्य लोकांच्याच साधनाचा वापर करून त्यांचे सांस्कृतिक अपहरण केले आणि आपला प्रभाव सिद्ध केला. या प्रभावातून या देशात दोन प्रकारच्या जीवनाधारेवर आधारित दोन प्रकारचे लोकसाहित्य प्रभावित झालेले होते.अर्थात या दोन प्रकारच्या जीवनधारेची जीवनपद्धती, विचारपद्धती, त्यांचे लोकमानस आणि लोकतत्त्वे ही परस्परांपासून वेगवेगळी होती हे स्पष्ट होते.ही लोकतत्त्वे म्हणजे काय? ती कशी होती? यासंबंधी विचार करणे अपरिहार्य आहे.

लोकतत्त्वे म्हणजे काय**?:**

लोकतत्त्वे या शब्दांची 'लोक+तत्त्वे' अशी फोड करता येते. विवक्षित जीवनधारणेने जगणारा समूह म्हणजे लोक होय. तर 'तत्त्व' म्हणजे विचार,जीवन जगण्याची पद्धती, जीवनमूल्ये, विचारमूल्ये होय. या लोकतत्त्वांच्या अनेकांनी व्याख्या केलेल्या आहेत. डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात,' व्यक्तिनिर्मित वाङ्मयकृतीत किंवा कलाकृतीत अपरिहार्यपणे येणाऱ्या या लोकसमूहाच्या मानसिक आविष्कारास लोकसाहित्याची लोकतत्त्वे असे म्हणतात.'११ तर डॉ. दुर्गा भागवत म्हणतात,' व्यक्तीचे रानटी अवस्थेतून प्रगतीकडे होणारे संक्रमण ज्या अंगभूत मूल्यविचारांतून होते. असे मूल्यविचार म्हणजेच लोकतत्त्व होय.'१२ या दोन्ही व्याख्यावरून लोकतत्त्वे ही लोकमनांची निर्मिती आहे. लोकांचे मन हेच लोकतत्त्वांचे जन्मस्थान आहे. लोकमनाची जडणघडण ही लोकजीवनातील अनुभवाच्या, घटना, प्रसंगाच्या चढ- उतरातून होत असते. लोकमानस हे लोकजीवनाच्या जीवन जाणीवेतून तयार होते. लोकांची नैसर्गिक प्रवृत्ती ही इंन्टेक करण्याची, इंटेक केल्यावर आलेल्या सुस्तीमुळे झोप घेण्याची, नैसर्गिक आपत्तीचे भय वाटण्याची आणि आऊटलेट करण्याची आहे म्हणजे जेवा, झोपा,भय बाळगा आणि लैगिंक भावनेचे विरेचन करा ही प्रवृती आहे. परंतु या प्रकृतीचे व्यवस्थापन नीट करता आले पाहिजे. याकरिता लोकांनी काही भयाच्या भावनेची प्रस्थापना केली , या भयमुक्ततेसाठी आणि निसर्गाच्या आराधनेचा आग्रह, निसर्गाला संतुष्ट करण्यासाठी पुजा -अर्चेचे नियम घालून दिले. हे नियम लोकांच्या नैसर्गिक प्रवृत्तीविशेषाच्या व्यवस्थापनावर धाक राहावा, नियमन व्हावे, चांगली आजीविका करावी हाच त्याचा उद्देश होता.त्या विशिष्ट नियमानुसार लोकांनी आपल्या नैसर्गिक प्रवृतीचे विरेचन केले तर ती चांगली बाब मानली जाते आणि नियमानुसार आचरण केले नाही तर ती बाब वाईट मानली जाते. नियमात नियम पाळण्याचे बंधन असते . यातून काय चांगले आणि काय वाईट यांचा जन्म झाला आहे. याला आधार मानुन काही लोक जीवन जगतात आणि काही हा आधार नाकारून जीवन जगतात. यातून लोकसमूहात चांगल्या वाईटांची समज दृढ झाली आहे आणि यातून लोकांचे लोकमानस निर्माण झाले आहे. या लोकमनातूनच लोकतत्त्वे आकाराला आली आणि लोकसाहित्यातील कथा,गीते इ.तून साकार झाली आहे. लोक जगतांना लोकतत्त्वांतून त्या त्या काळातील लोकांचे लोकमानस कसे आहे याचे दर्शन घडते.लोकमन हे पारंपरिकतेसह आधुनिकताही अंगिकारत असते.पारंपरिक लोकमनाची लोकतत्त्वे ही अंधश्रद्धात्मक,अनिष्ट रूढी,प्रथा परंपरेची, वर्णव्यवस्थेची, कर्मकांडाची, विषमतेची तसेच पारलौकिकत्वाची निर्मिती करतात.यावर पारंपरिक लोकसमाज, त्यांची लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य उभे करत असतात. तर ज्या लोकमनांनी आपल्या मनाला या पारंपरिक लोकतत्त्वांपासून स्वतंत्र केलेले असते अशी स्वतंत्र झालेली मने ही इहवादी, मानवतावादी, वैज्ञानिक दृष्टीची आणि पुनर्रचनावादी मने झालेली असतात. अशी मुक्त मने ही सद्विवेकावर,बुद्धिप्रामाण्यावर आधारित समतामयी, बंधुतामयी,सामाजिक न्याय आणि स्वातंत्र्य अशी आधुनिक लोकतत्त्वे जन्माला घालतात आणि लोकसमाजाची, लोकसंस्कृतीची आणि लोकसाहित्याची निर्मिती करत असतात. लोकतत्त्वे ही लोकसमूहाला एकनिष्ठ, एकसंध ,समध्येयी ठेवण्याचे कार्य करतात. ती मागच्या आणि पुढच्या पिढीला जोडण्याचे काम करतात.ही लोकतत्त्वे लोकमानसाची निर्मिती असून ती लोकांसाठी असते. ती लोकसंस्कृतीचा अमूल्य असा ठेवा असतो.लोकतत्त्वे ही लोकमानसाची लोकसमूहाची निर्मिती असल्यामुळे या लोकतत्त्वांचे लोकसाहित्याशी रक्ताचे नाते असते. लोकसाहित्य हे लोकसमूहमनाचे साहित्य मानले जाते.लोकसाहित्याला कर्ता नसतो तो अनामिक असतो असे मानले जाते. परंतु ही धारणा सद्विवेकाला पचनी पडणारी वाटत नाही.कारण एखादी कल्पना एखाद्याच्या डोक्यात आल्या शिवाय, ती त्याने विशिष्ट फॉर्म मध्ये साकार केल्या शिवाय, ती समुहमनाला मान्य झाल्याशिवाय आणि त्या लोकसमुहाने ती आपली म्हणून स्वीकारल्याशिवाय लोकसाहित्य कसे संभवू शकेल.मुळात साहित्य हे व्यक्तिनिर्मितच असते आणि ही व्यक्ती लोकसमूहाच्या,

लोकमानसाच्या प्रभावाने ,संस्काराने प्रभावित झालेला असतो.त्याने निर्माण केलेल्या साहित्यातून लोकमनातील लोकतत्त्वेच प्रकट होत असतात. या तत्त्वात बंधन नसते तर सद्विवेक स्वीकारशीलता असते .ही लोकतत्त्वे लोकमनांनी स्वीकारलेली जीवनपद्धतीच असते. या लोकतत्त्वांचा, जीवनपध्दतीचा एकदा लोकसमूहमनांनी स्वीकार केला की, ही लोकतत्त्वे लोकसमूहाचीच होतात आणि लोकसाहित्यनिर्माता किंवा कर्ता हा वजा होऊन त्याचे साहित्य हे लोकसमूहाचे मानले जाते. त्यामुळे लोकसाहित्याला कर्ताच नसतो असे मानने हे कुठे तरी सद्विवेकाला पटणारे वाटत नाही एकदा या कर्त्याने लोकसाहित्य निर्माण केले आणि ते लोकांच्या हवाली केले की लोकसाहित्याचा कर्ता लोकसमूहाच्या पडद्याआड जातो .अर्थात लोकसमूहात विरघळून जातो.लोकसाहित्यातील लोकतत्त्वे ही लोकांची जीवनपद्धती,आचारविचार पद्धती मानली जाते. ही लोकतत्त्वे त्या समाजाच्या एकसंधतेच्या दिशाही असतात आणि लोकसमुहाला एकसंध बांधून त्याचे लोकांच्या नैसर्गिक प्रवृत्तीचे व्यवस्थापनही करतात.लोकांच्या बदललेल्या गरजेतून लोकतत्त्वे जन्माला येतात आणि ती लोकसाहित्यातून व्यक्तही होत असतात. लोकतत्त्वांचा आणि लोकसाहित्याचा वृक्ष आणि भूमीसारखा जन्यजनक असा संबंध आहे.

लोकसाहित्य आणि लोकतत्त्वाची देशहीतवादी दिशा दृष्टी :

भारतीय संविधान हा राष्ट्रीय ग्रंथ आहे. 'मी प्रथम ही भारतीय आणि अंतिमतःही भारतीय आहे'असे तो सांगतो आहे. देशहीतासाठी प्रथम भारतीय होणे आवश्यक आहे. पारंपरिक लोकसाहित्यातून असे भारतीय होण्याची लोकतत्त्वे आविष्कृत झाली का ? याचे उत्तर नाही असेच द्यावे लागते. त्याचे कारण डॉ. यशवंत मनोहर म्हणतात,' लोकसंस्कृतीत अध्यात्म शिरले आणि ते आपल्या शोषणाच्या सर्व लवाजम्यासह शिरले.आध्यात्मिकांच्या कर्मविपाकाने या देशाला अधोगतीच्या गहन डोहात बुडविले. या देशाची जमीन अनेक शतके नांगर फिरवून उद्‌ध्वस्त केली. लोकसंस्कृतीच्या मनात अध्यात्म व कर्मविपाक याची प्रस्थापना करण्यात ज्या काळात आर्य यशस्वी झाले तो काळ या देशात परिवर्तनमारक, क्रांतिमारक मानसिकतेच्या प्रस्थापनाचा काळ ठरला.'१३ यावरून लोकांची मने ही पारंपरिक धर्मग्रंथावर, कर्मकांडावर, पारलौकिकतेवर तयार केली.त्यामुळे पारंपरिक लोकसाहित्याने धर्माधिष्ठीत वर्णव्यवस्थेवर लोकांची श्रमविभागणी करणारी, जातीची विभागणी करणारी, स्त्री- पुरुषात भेद करणारी वैष्यमकारक लोकतत्त्वे आणि त्यावर आधारित जीवनधारणा आविष्कृत केली. या वैदिकांच्या लोक साहित्याने लोकांच्या एकसंध जीवनाला विरोध करणारीच लोकसंस्कृती,लोकतत्त्वे आविष्कृत केल्याने असे लोकसाहित्य भारतीयत्व निर्माण करू शकले नाही उलट या साहित्याने लोकांच्या समुदायाचे विभाजन केले आणि यातच एकसंधत्त्व असल्याचे सांगितले.त्यामुळे या लोकसाहित्याला भूतकाळ आहे पण भविष्य नाही. अशा स्थितीशील लोकसाहित्याकडून देशहीताच्या लोकतत्त्वांची अपेक्षा करणे तर सोडाच पण त्याने तत्त्वांची उपेक्षाच केली आहे.या लोकसाहित्याने उच्च-नीच,देव- देवतांच्या कृपेवर जगणारे परावलंबी मानसिकतेचे लोक घडविले, परलोकांशी लोकांच्या कर्माचे आणि विषमतेशी लोकांच्या कर्माचे नाते जोडले, याचा परिणाम लोक प्रारब्धवादी ,दैववादी बनले. त्यामुळे प्रयत्नवाद मातीत गाडला गेला.स्त्रियांना दुय्यम लेखून तिला भोगवस्तू केले,त्यामुळे स्त्री-पुरुष यांच्यात विषमता निर्माण झाली.नैसर्गिक समतेचा खून झाला.विज्ञाननिष्ठा गायब केली, त्यामुळे कोणत्याही घटनेमागचा कार्य- कारणभावाचा शोध घेऊन वाईट कार्याच्या मागे वाईट असलेल्या कारणाचा शोध घेणे खुंटून टाकले. त्यामुळे सदाचाराची होळी केली. ही तत्त्वेच लोकसाहित्याने आविष्कृत केली आहेत. यासंबंधी डॉ. यशवंत मनोहर म्हणतात,' लोकवाङ्मयाचा उपलब्ध झालेला बव्हंशी भाग हा आपल्या देशातील खास सरंजामी जीवन व्यवस्थेचे भजन करणारा आहे. लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडीस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीला मागे खेचून धरणारा आहे.'१४ यावरून या साहित्याने मती कुंठीत करण्याचीच भूमिका पार पाडली आहे.

ज्या साहित्याने लोकांच्या मेंदूला गोठवले ते साहित्य नवेसर्जन आणि नव्या देशहीताची कोणतीही तत्त्वे लोकसंस्कृतीला देऊ शकत नाहीत.

भारतात सिंधू संस्कृती अस्तित्त्वात होती. या संस्कृतीने ऐहिक जीवनाशी कर्माचे नाते सांगितले, त्यावेळी गणपद्धती होती, या गणपद्धतीत स्त्रिया ह्या त्या गणाच्या नायिका होत्या, तसेच पुरुष सुद्धा गणाचे नायक होते. गण म्हणजे लोक. या लोकसमूहांनी लोकसमूहाच्या निर्वाहाकरिता एखाद्या पुरुषाला किंवा स्त्रीला सर्व संमतीने नायकत्व दिले जात असे .याचा अर्थ तेथे लोकशाही होती, यात समानता, माणसाच्या कर्मावर विश्वास होता, सदाचार होता, पुरुषापेक्षा स्त्रियांना अधिक सन्मान होता, नैतिक आचरणाला विशेष महत्त्व होते. वैज्ञानिक दृष्टीचा आचार होता. या मूल्यांचा वारसा पुढे चार्वाकांनी चालवला. श्रमण संस्कृतीचा वारसा महावीर, बुद्ध, सम्राट अशोक, म.फुले, छ. शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्ष करत चालवला. श्रमण म्हणजे परिश्रम,कष्ट करण्यासाठी भटकंती करणारा तसेच आपल्या जवळचे इतरांना वाटत फिरणारा असा अर्थ होतो.बुद्धाने गृहत्याग करून फिरस्ती होऊन लोकांना त्याकाळात जीवनातील सर्व श्रेष्ठ चार सत्य सांगितली. यातील पहिले दुःख आहे, दुसरे दुःखाचे मूळ कारण ,तिसरे दुःखाचे समूळ उच्चाटन आणि चौथे दुःख निरोधाचा मार्ग ही चार सर्वश्रेष्ठ सत्य आहेत. त्यांचे फिरणे हे निर्हेतुक आणि रंजनासाठी नव्हते.त्यांनी हे सत्य लोकांना सांगण्यासाठी स्वतः पायपीट केली. त्यांनी दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प , सम्यक वाणी , सम्यक कर्मांत , सम्यक आजिविका , सम्यक व्यायाम,सम्यक स्मृती, सम्यक समाधी या मार्गाने माणसाला दुःख मुक्ती मिळते.त्याच्या या फिरस्तीपणाच्या श्रमामुळे त्यांना थकवाही येत असेल पण त्यांनी कधीही श्रमपरिहाराकरिता मद्यपान केले नाही आणि त्यात ते रंजन म्हणून सहभागी झाले नाही. उलट त्यांनी प्राणीमात्रांची हिंसा करू नये, चोरी करू नये, लैगिंक दुराचार किंवा व्याभिचार करू नये, असत्य किंवा खोटे बोलू नये आणि मादक पदार्थाचे सेवन करू नये अशी सर्व लोकांना मान्य होणारी आणि सर्व लोकांचा विकास करणारी पंचशील तत्त्वे सांगितली आहे. बौद्ध हा धर्म नसून तो निधर्मी धम्म आहे. त्यांनी स्वतःला कधी मुक्तीदाता म्हणून लोकांना सांगितले नाही तर त्यांनी मार्गदाता म्हणून सांगितले. कोणतीही पारलौकिक शक्ती तुमचा उद्धार करणार नाही तर तुम्हाला स्वतःच 'अत्त दिप भव' व्हावे लागेल म्हणजे स्वतःच स्वतःचा स्वयंप्रकाश व्हावे लागेल हे सांगितले.ही लोकतत्त्वे लोकांच्या जीवन आणि राष्ट्र जीवनाचा उद्धार करणारी आणि संपूर्ण लोकांना एकसंध ठेवणारी लोकतत्त्वे आहे. ही धर्मनिरपेक्ष लोकतत्त्वे आहेत.या सर्व लोकतत्त्वांचा उजेड भारतीय संविधानात आहे. हे संविधान सांगते की, 'आम्ही भारतीय लोक' या भारतीय लोकांचे हे इहवादी लोकसाहित्य आहे. हे लोकसाहित्य लोकांच्या एकसंधतेची लोकतत्त्वे प्रकट करत आले आहे. जे लोक स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, सहिष्णूता,सेवा,सहकार, त्याग, बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठा, पुनर्रचना, मानवतावाद या लोकतत्त्वांना आपला जीवनाचा श्वास मानून जगत आहे.जीवनात अंहिसा,शांतता, प्रेम, सदाचार, सद्विवेक या मूल्यांचे आचारण करत आहे. विसंवादाऐवजी सुसंवादाने मार्ग काढत आहे.संविधान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, संसद, पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालय, प्रशासन, सैन्य, बँक, मुद्रा इत्यादीत कोणतेही वैष्यम्य न ठेवता यावर विश्वास ठेवत आहे आणि देशहितासाठी प्राणाचे बलिदान देत आहे.या मानसिकतेतून आपला जीवनव्यवहार करत आहे.तेच लोक या क्रांतिसंविधानाचे एकसंध भारतीय लोक आहेत आणि हीच देशहीताची लोकतत्त्वे देखील आहेत.

आजच्या लोकसाहित्याची निर्मिती करणारे मन हे वरील लोकसमूहाच्या मनाचीच लोकतत्त्वे प्रकट करणारे आहे.अशी मने वेगवेगळ्या जीवनस्तरातून देशहीतासाठी पुढे येऊ लागली आहे. या पुढे येणाऱ्या लोकमनांनी केवळ लोकांचीच नव्हे तर लोकसाहित्याचीही पुनर्रचना केली आहे. या लोकसाहित्याने केवळ आपले बाह्यरूपच बदलून घेतले नाही तर अंतस्थ असलेला लोकतत्त्वांचा गर्भाशयही बदलून घेतला आहे. पारंपरिक लोकसाहित्यपणाच्या अनेक

अंधश्रद्धांना आजच्या लोकसाहित्याने नाकारत सद्विवेकांवर आधारित नवे लोकसाहित्य आणि लोकतत्त्वे स्वीकारली आहेत आणि ती आंबेडकरवादी,आदिवासी, ग्रामीण, सत्यशोधक अशा साहित्यातून साकार होत आहेत. हे साकार करणारा लेखक हा लोकमनांच्या, लोकसमूहाच्या जीवनजाणिवांचे हुंकार साकारत असल्याने तो लोकांचाच लेखक झाला आहे.असा लोकलेखकच संविधानाला अभिप्रेत असणाऱ्या लोकतत्त्वांचा आविष्कार आजच्या आविष्कृत होत असलेल्या आंबेडकरवादी, आदिवासी,ग्रामीण अशा लोकसाहित्यातून करीत आहे.आजचे हे लोकसाहित्य देशहीताची लोकतत्त्वे लोकमनात रुजवत आहे. ती अधिकाधिक घट्ट करीत आहे आणि या लोकतत्त्वांना विरोध करणाऱ्यांविरूद्ध निकराचा संघर्ष करीत संविधाननिष्ठ संस्कृतीचे,राष्ट्रविकासाचे ध्येय, स्वप्न साकारत आहे. हा आंबेडकरवादी लोकसाहित्याच्या भूमिकेचा हस्तक्षेप भुतकाळातील अनिष्टतेचे दर्शन घडवत वर्तमानाला दुरूस्त करत आहे. ही प्रतिज्ञा घेऊनच हे नवे लोकसाहित्य राष्ट्रबांधणीला भरभक्कम मजबूत करीत आहे. त्यामुळे आजच्या लोकसाहित्याने देशहीताची शपथ घेऊनच श्रमणसंस्कृतीतील लोकतत्त्वांचा वारसा आणि त्याचा विकास केलेला आहे.आजवर आदिम श्रमणसंस्कृतीतील लोकांच्या लोकतत्त्वांचे केलेले अपहरण, लोकमनाची केलेली मुस्कटदाबी आता आजच्या आतून बाहेरून परिवर्तित झालेल्या आणि स्वतःची सतत पुनर्रचना करणाऱ्या आजच्या लोकसाहित्यातून देशहीताची भूमिका व्यक्त होत आहे. ही बाबच चौकटीतील लोकसाहित्याची केवळ कुसच नाही तर मुसही नव्याने बदलून घ्यायला सांगत आहे. लोकांचे अनेकार्थाने परतंत्र असलेले मन स्वतंत्र झाल्याशिवाय लोकसाहित्याला कोणताही अर्थ ठरणार नाही. ते बीनबुडाचे आणि बीनशेंड्याचे भूमिकाहीन साहित्य ठरेल ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

निष्कर्ष:

लोकसाहित्य आणि देशहीत लोकतत्त्वे : दिशा आणि दृष्टी या विषयाचे आकलन केले असता काही ठळक निष्कर्ष हाती लागतात.मुळात मौखिक साहित्य हेच लोकसाहित्य असते, कर्ता अनामिक असतो ही धारणाच या साहित्याला अंधश्रध्देच्या चौकटीत बंदिस्त करणारी आहे. असे साहित्य लोकमनाच्या परतंत्रतेचेच दर्शन घडवत शोषणसत्तेची विषमता मूल्ये हीच गौरवशाली लोकतत्त्वे मानून त्याचे आविष्करण करत आले आहे.आज देशहीत लोकतत्वांचा प्रश्न नव्याने पुनर्विचार करायला सांगत आहे. आज देश हा देश राहिला नाही. या देशात अनेकार्थाने अंतर्विरोधग्रस्तता निर्माण झाली आहे. देशहीतासाठी लोक आणि भूमी यांची गरज आहे.लोक समध्येयी, समदिशेने,समनिष्ठेने,एकसंध मानसिकतेने जगणारे लोक म्हणजे राष्ट्र ठरते.एकसंधपणा, समानता, मनाची निर्मळता आणि जनता हे देशहीताचे घटक तत्त्वे आहेत.ही तत्त्वेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची लोकतत्त्वे आहेत आणि तेथेच आम्ही भारतीय लोक आणि भारतीय क्रांतिसंविधान आहे.परंपरेचे वैभव सांगणारे वैदिकांचे लोकसाहित्य आणि परिवर्तनाचे वैभव सांगणारे लोकसाहित्य असे दोन प्रकारचे लोकसाहित्य आहे. मनाने परतंत्र असलेल्या लोकसाहित्याने वैष्यम्य लोकतत्त्वांचा तर मनाने स्वतंत्र झालेल्या लोकसाहित्याने समतेच्या लोकतत्त्वांचे आविष्करण केले आहे.लोकतत्त्वे ही लोकमनातील लोकांच्या एकसंध ठेवण्याच्या जीवनधारेच्या वस्तीचा पुल आहे.आज आंबेडकरवादी, आदिवासी, ग्रामीण आणि सत्यशोधक या लोकसाहित्याने संविधाननिष्ठ लोकतत्त्वे देशहीत लोकतत्त्वांच्या दृष्टीने विधायक भूमिका घेऊन मांडलेली आहेत आणि मांडत आहे.

संदर्भ

1. कसबे मिलिंद,आंबेडकरवादापुढील नवी आव्हाने, सनय प्रकाशन,नारायणगाव,प्र.आ.१९ फेब्रु.२०१८, पृ.४१,४२
2. तत्रैव,पृ.४२
3. डहाट धनराज, डॉ. आंबेडकरआणि काश्मीर समस्या, संकेत प्रकाशन, नागपूर, द्वि.आ. डिसेंबर २००३,पृ.१४
4. मनोहर डॉ.यशवंत, भारताचे क्रांतिसंविधान, हर्मिस प्रकाशन,पुणे, प्र.आ.डिसें.२०१८,पृ.३०
5. http://lib.unipune.ac.in. Dated 7/12/2021,page No.31
6. मनोहर यशवंत, भारताचे क्रांतिसंविधान, हर्मिस प्रकाशन, पुणे,प्र.आ.डिसें २०१८, पृ.२८
7. व्यवहारे विद्या,लोकसाहित्य- लोकसंस्कृती, प्रतिमा प्रकाशन,पुणे,प्र.आ.२००२ पृ.२५
8. मांडे प्रभाकर,लोकसाहित्याचे स्वरूप,गोदावरी प्रकाशन,औरंगाबाद, प्र.आ.१९८९,पृ.२६
9. भवाळकर तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन पुणे, प्र.आ.२००७, पृ.५
10. मनोहर यशवंत, समाज आणि साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ.६ डिसें.१९९२,पृ.१३९
11. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन,औरंगाबाद, प्र.आ.१९८९, पृ.३४३
12. १२)http://lib.unipune.ac.in.dated7/12/2021,PageNo.16
13. मनोहर यशवंत, समाज आणि साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ.६ डिसें.१९९२,पृ.१४०
14. तत्रैव, पृ.१४०